Original Article
ISSN (Online): 2582-7472

ShodhKosh: Journal of Visual and Performing Arts
July 2024 5(7SE), 95–100

# “NAXALISM AND INDIA'S INTERNAL SECURITY: CAUSES AND SOLUTIONS”

# “नक्षलवाद आणि भारताची अंतर्गत सुरक्षा: कारणे आणि उपाय”

Dr. R. S. Pawar [1]

[1] Associate Professor, Department of Defence Science, R.C. Patel College Shirpur District-Dhule, India

https://crossmark.crossref.org/dialog/?doi=10.29121/shodhkosh.v5.i7se.2024.5836&domain=pdf&date_stamp=2024-07-31

**Corresponding Author**

Dr. R. S. Pawar,
rspawar1742@gmail.com

**DOI**
**10.29121/shodhkosh.v5.i7SE.2024.5836**

**Funding:** This research received no specific grant from any funding agency in the public, commercial, or not-for-profit sectors.

**Copyright:** © 2024 The Author(s). This work is licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.

With the license CC-BY, authors retain the copyright, allowing anyone to download, reuse, re-print, modify, distribute, and/or copy their contribution. The work must be properly attributed to its author.

## ABSTRACT

**English: Introduction –** Mismanagement of forests has been an issue since the British ruled India. The British government brought laws to monopolize forest resources, which were useful for this. After 1990, when the Indian government started using the natural resources of forests, the situation worsened. This created a spark in the hearts of the people living in the forests and they contributed to the movement against the Indian government. India is the seventh largest country in the world in terms of geographical area and is spread across various geographical, social, cultural, religious, linguistic and regional states. Naxalism is seen as the main threat to internal security in India since independence. The exploitation of the poor, agricultural laborers and forest dwellers, tribal people, the oppression of the poor, especially agricultural laborers, by the rich landlords, the capitalist-dominated policy of the government and to bring justice to all the exploited and oppressed people, communist organizations came together in the country in 1967. This oppression carried out by the government with the help of the rich can be ended only through the armed revolution shown by Mao. This blood-stained movement started from this ideology. This so-called revolution, which started from Naxalwadi in West Bengal, is still going on today and has spread to many parts of the country. As this movement, which started with a noble communist motive, became armed, it started straying from its original purpose. This movement is being carried out by collecting extortion from politicians and wealthy businessmen. As a result, the Naxal movement has become a major threat to India's internal security today.

**Objectives-**

1) To study the threats of Naxalism to national security.
2) To understand the history and background of the Naxalism movement.
3) To study the causes, solutions and conclusions of the facts.

**Assumptions-**

1) Naxalism originated in the village of Naxalbari in West Bengal in 1967.
2) Poverty, unemployment and lack of basic facilities led to the growth of Naxalism.
3) Due to the failure of administration, the influence of the government in the tribal areas remained low.
4) Naxalite groups use sophisticated weapons and guerrilla warfare techniques.
5) Even today, Naxalism is active in parts of Chhattisgarh, Jharkhand, Odisha and Maharashtra.

**Hindi:** परिचय – ब्रिटिशांनी भारतावर राज्य केल्यापासून जंगलांचे गैरव्यवस्थापन हा एक मुद्दा आहे. ब्रिटिश सरकारने वनसंपत्तीचे मक्तेदारी करण्यासाठी कायदे आणले, जे यासाठी उपयोगी पडले. १९९० नंतर जेव्हा भारत सरकारने जंगलांच्या नैसर्गिक संसाधनांचा वापर सुरू केला तेव्हा परिस्थिती आणखी बिकट झाली. यामुळे जंगलात राहणाऱ्या लोकांच्या हृदयात एक ठिणगी निर्माण झाली आणि त्यांनी भारत सरकारविरुद्धच्या चळवळीत योगदान दिले. भारत भौगोलिक क्षेत्रुळाच्या दृष्टीने जगात सातव्या क्रमांकावर असुन विविध भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक, धर्म, भाषा, प्रांत यांनी भिन्न राज्य व्याप्त आहे. स्वातंत्र्यापासून आजपर्यंत भारतासमोर अंतर्गत सुरक्षेला जी धोके, समस्या निर्माण झाल्या आहेत त्यातील प्रमुख धोका म्हणून नक्षलवाद दिसुन येतो. गरीब, शेतमजुर आणि वनवासी, आदिवासी लोकांचे होणारे शोषण, धनाढ्य जमीनदारांकडून गरीबांवर विशेषतः शेतमजुरावर होणारे अत्याचार, सरकारचे भांडवलशाही धार्जिने धोरण ह्याला विरोध म्हणून आणि तमाम शोषित पिडीत जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी १९६७ साली देशात साम्यवादी संघटना एकत्र

आल्या. सरकारने धनदांडग्यांच्या मदतीने चालवलेल्या ह्या अत्याचाराला माओने दाखविलेल्या सशस्त्र क्रांतीच्याच एकमेव मार्गाने संपवता येईल. ह्या विचारासरणीतून ही रक्त रंजित चळवळ सुरू झाली. पश्चिम बंगाल मधल्या नक्षलवाडी येथून सुरू झालेली ही तथाकथित क्रांती आजतागायत सुरू आहे आणि देशाच्या अनेक भागात पसरली आहे. साम्यवादी उदात्त हेतूने सुरू झालेली ही चळवळ जसजशी सशस्त्र होत गेली तसतशी मुळ उद्देशापासुन भरकटू लागली. राजकारणी आणि धनदांडग्या व्यवसायिकांपासून खंडणी वसुल करून ही चळवळ सुरू आहे. परिणामी भारतीय अंतर्गत सुरक्षेला नक्षल चळवळीचा मोठा धोका आज निर्माण झालेला आहे.

उद्देश-

1) राष्ट्र सुरक्षेतिल नक्षलवादाचा धोकांचा अभ्यास करणे.
2) नक्षलवाद चळवळीचा इतिहास, पार्श्वभूमी समजून घेणे.
3) कारणे, उपाय व निष्कर्ष तथ्यांचा अभ्यास करणे.

गृहीतके-

1) नक्षलवादाचा उगम १९६७ साली पश्चिम बंगालच्या नक्षलबारी गावातून झाला.
2) दारिद्र्य, बेरोजगारी आणि मूलभूत सुविधांचा अभाव यामुळे नक्षलवाद वाढीस लागला.
3) प्रशासनाच्या अपयशामुळे आदिवासी भागांत शासनाचा प्रभाव कमी राहिला.
4) नक्षलवादी गट अत्याधुनिक शस्त्रास्त्रे आणि गुरिल्ला युद्धतंत्र वापरतात.
5) ५आजही छत्तीसगड, झारखंड, ओडिशा आणि महाराष्ट्रातील काही भागांमध्ये नक्षलवाद सक्रिय आहे.

**Keywords:** The Present Study Mentions Very Specific Keywords Like Naxalism, Violence, Guerrilla Warfare, Tribal Areas, Governance, Poor, Agricultural Labourers and Forest Dwellers, Various Geographical, Social, Cultural, Religious, Language, Region, Internal Security of India etc, प्रस्तुत अध्ययनात अतिशय विशेष मुख्यशब्द नक्षलवाद ,हिंसा गुरील्ला युद्धतंत्र आदिवासी भाग शासन व्यवस्था गरीब, शेतमजुर आणि वनवासी, विविध भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक, धर्म, भाषा, प्रांत ,भारताची अंतर्गत सुरक्षा इ विशेष शब्दांचा उल्लेख आहे

# 1. प्रस्तावना

## 1.1. संशोधन पध्दती

प्रस्तुत शोध अध्ययन मध्ये “नक्षलवाद आणि भारताची अंतर्गत सुरक्षा: कारणे आणि उपाय” लेखन विस्तार करिता प्रथम, दुय्यम साहित्य साधनांचा टेलिव्हिजन मेडिया वरील सामरिकी लष्करीदृष्ट्या विश्लेष्णात्मक चर्चा विषयतज्ञांची मते संदर्भ विषय विवेचन विश्लेषणात्मक व वर्णनात्मक स्वरुपात केले आहे.की ज्यातून सहज अध्ययन करता येईल.

# 2. संशोधन पूर्व साहित्याचा आढावा

नक्षलवाद हा भारताच्या अंतर्गत सुरक्षेसमोरील एक मोठा धोका आहे. याला "डाव्या विचारसरणीचा दहशतवाद" असेही संबोधले जाते. नक्षलवादी चळवळ ही मुख्यतः आदिवासी आणि ग्रामीण भागांमध्ये सक्रिय आहे, जिथे सामाजिक आणि आर्थिक असमानता मोठ्या प्रमाणावर आढळते या विषयावर अनेक राष्ट्रीय अंतराष्ट्रीय सेमिनोर सरकार पातळीवर शासणाचे प्रवक्ते यांनी अनेक वेळा या विषयावर गहन चर्चा करून त्यावर उपाय योजना शोधण्याचा प्रयत्न झाला.

# 3. नक्षलवाद चळवळ

साम, दाम, दंड व भेद अशा कुठलाही टोकाच्या तंत्राने लोकशाही आणि संविधानाच्या मार्गाला धक्का पोहचुन सत्ता हस्तगत करणे हेच माओवाद्यांचे प्रमुख ध्येय आहे. समाजातील सर्व स्तरातील घटकांचा उपयोग ते अतिशय बेमालूपणे त्यांच्या विध्वंसक उद्दिष्टांसाठी करतात. 'फोर्च जनरेशन वॉर' या नावाने हे छुपे युध्दतंत्र आपल्या भोवताली पोहचले आहे ही धोक्याची घंटा आहे. अलिकडच्या भीमा कोरेगाव दंगलीमागे हिन्दुत्ववादी किंवा आंबेडकरावाद्यांचा कुठलाही सहभाग नसुन हा विध्वंस माओवाद्यांनीच घडवून आणला.

याचाच अर्थ नक्षलवाद्यांचा मुळ हेतु किंवा उद्देश नव्या विचारसरणीच्या आणि तरूणांच्या डोक्यात राष्ट्रसत्तेविरूध्द विष पसरवून मुळ उद्देशापासुन नक्षलवाद भरकटली आहे आणि तिचा राष्ट्र सुरक्षेला मोठा धोका निर्माण झाला आहे. आज पन्नास वर्षानी देखील ही चळवळ सुरू आहे. आणि आपला प्रभाव वाढवित आहे. केंद्र आणि राज्य सरकारे नक्षलवाद संपविण्यासाठी अनेक उपास योजना राबवित आहे. परंतु सरकारच्या हाती काही लागत नाही. गेल्या पन्नास वर्षात अब्जावधी रूपये, निष्पाप नागरिकांचे आणि जवानांचे जीव गमावून देखील आपल्याला नक्षलवाद संपविता आला नाही. भारताचे

लष्कर, निमलष्कर आणि पोलिस सामर्थ्य श्रीलंकेपेक्षा सरस आहे एवढच नाही तर तमिलवाद्यांच्या उच्चाटनासाठी भारताने आपले सैन्य श्रीलंकेत पाठवले होते. भारताकडे अत्याधुनिक युध्दतंत्रज्ञान, शस्त्रसाठी असुनही आपण गेल्या पन्नास वर्षात नक्षलवादावर पाहिजे तसं नियंत्रण मिळवू शकलो नाहीत. एकीकडे ग्रामीण भागात सशस्त्र सशस्त्र लढा सुरू आहे. तर शहरी भागात अनेक मुखवंट्यांच्यसा आत नक्षलवाद फोफावत आहे. शहरी भागात अनेक शिक्षणसंस्था, विद्यापीठे आणि पत्रकारीकेत स्थिरावलेल्या डाव्या विचार सरणीच्या लोकांनी समाजात फुट पाडण्यास सुरूवात केली आहे. शहरी भागात स्थिरावलेले हे डावे नक्षलवादाचे छुपे समर्थकच आहेत. श्रीलंका सारखा छोटा देश तमिलवाद्यांचा नायनाट करू शकतो. तर भारत नक्षलवादाचा खातमा का करू शकत नाही. भारताकडे सामर्थ्य आहे तरी अजुनही नक्षलवाद संपत नाही. देशाच्या नक्षलग्रस्त भागातील सर्वच राजकीय पक्ष ह्यावरून राजकारण करत असतात. आज नक्षलवादी गट व त्यांचे समर्थक देशाच्या २० राज्यांतील २२० जिल्ह्यात सक्रिय आहेत. हा 'लाल पट्टा' आदिवासीबहुल भाग आहे. नक्षलवादी संघटनांविरूध्द कडवा संघर्ष गेली पन्नास वर्ष सुरू आहे. नक्षलग्रस्त भाग असल्याने कामाची पहाणी मुल्यमापन होतच नाही. योजना कागदावरच राहतात. निधी खर्च होता. एकदम नक्षलवादीच्या स्फोटात पुल, रस्ते, इमारती नष्ट होतात. यांच्या मुळाशी जायला कुणी धजावत नाही. नक्षलवादाला चालना मिळत राहते. निष्पाप लोकांचा व जवानांचा बळी दिला जातो.

## 4. नक्षलवाद दहशतवादच आहे

कोणताही दहशतवाद संपविण्याचा असेल तर त्यांच्या विचारसरणीला आधी मात द्यावी लागते. आपल्या देशामध्ये नक्षलवादी हे दहशतवादीच आहेत की नाही ह्यावर जो पर्यंत चर्चा चालेल तो पर्यंत आपली सुरक्षादले नक्षलवाद्यांचा काहीही बिघडवू शकत नाही. कोणत्याही समाजामध्ये दोन आर्थिक पार्श्वभूमिचे लोक असतात. श्रीमंत आणि गरीब, श्रीमंताच्या हातात उत्पादनाची साधने असतात. त्यांच्या बळावर ते गरीबांचे शोषण करतात ही परिस्थिती बदलायला कष्टकरी वर्ग पुढे येतो आणि प्रस्थापित व्यवस्था उखडून फेकुन देतो. ही क्रांती हिंसक व रक्तरंजित आहे अशा विचारसरणीनेच नक्षलवादी प्रभावी झालेले असतात. गरीबांची त्यांच्यावर होणाज्या अन्यायांची त्यांच्या होणाज्या शोषणाची चित्र प्रभावीपणे मांडून १८ ते २२ वयोगटातल्या तरूण मुलामुलींना या चळवळीमध्ये खेचण्याचा प्रयत्न सुरू होवुन १२ वर्ष लोटली आहेत. जर हा लढा खरोखरच शोषितांचा असेल तर गांधीवाद मुर्खपणा ठरतो. कारण तुमचे हेतु काहीही असोत तुमची धोरणेच शेवटी तुमचाच शेवट ठरवत असतात. साध्य नव्हे तर साधनच' महत्वाचे असतात हे गांधीजी सांगायचे ते ह्याचसाठी ज्या सैनिकांचा बळी हा लढा पुढे नेला जातो ते सैनिक खुद्य सधन कुटूंबातील किंवा शोषक नसतात. तेही गरीब कुटूंबातील असतात. अशा सैनिकांचा बळी घेवून जाणारा हा लढा नेमका कश्याचा बदला घेतोय, नक्षलवादाच्या कारवायांमागे त्यांच वचितपण होत हे क्षणभर मान्य करू या पण हा जर न्याय लावायचा झाला तर १९९३ चे मुंबई बॉम्ब स्फोट हे बाबरी मस्जिद विध्वंस आणि मुंबईतल्या दंगली ह्याची स्वाभाविक प्रतिक्रिया म्हणून गृहीत घराव्या लागतील, नक्षलवादाच्या समर्थकांची ही तयारी आहे काय? कोणत्याही धर्माचे अतिरेकी लोकांचा ब्रेन वॉश करून आपलं मनुष्यबळ वाढवत असतात. नक्षलवादी ह्या पेखा वेगळ काही करत नाही. जो पर्यंत सिस्टीम मधील लोक नक्षलवाद हा सुध्दा दहशतवादच आहे हे स्पष्टपणे मान्य करणार नाहीत. तो पर्यंत ह्या समस्येवर समाधान निघणं अशक्यच आहे. आणि भारताची अंतर्गत राष्ट्रीय धोक्यातच राहणार आहे.

## 5. शेजारील राष्ट्र

नक्षलवाद मुळातच चीन मधील बिजिंगच्या स्ट्रेटेजीवर चालत आहे. माओचे रूपांतर नक्षलवाद आहे. भुतकाळातील घटनांचा आढावा घेतला तर भारताच्या लोकशाही राजनीतिवर घाला घालण्याचे काम वेगाने सुरू आहे. नक्षलवादाचे श्रध्दास्थान बिलिंग असल्याने चीन व पाकचे समर्थन मिळत आहे. आणि त्यांचे समर्थक बुच्दीवादी समाज सुधारक मानवतावादी लोक हे नवी दिल्ली, कोलकत्ता, पुणे, हैद्राबाद, बडोदा येथे परिषदा संवादामध्ये यशस्वी होत आहे. २००५ मध्ये नक्षलवाद्यांनी वापरलेल्या गोळ्यांचा केसेसवर पाकिस्तानी ऑर्डनन्स फॅक्टरीचे मार्किंग होते. २००८ मध्ये अंदाजे ५०० नक्षल्यांनी केरळ मध्ये सिम्मीच्या नियंत्रणाखाली शहीर गनिमचे प्रशिक्षण घेतले. आय.एस.आय. ने नक्षल्यांना एके ४७ रायफल्स प्रचंड हत्यारे दारूगोळा दिला.

## 6. फोर्थ जनरेशन वॉर फेअर

स्वतःच्या देशाशी केलेल्या सामरिक लढ्याला फोर्थ जनरेशन वॉर फेअर म्हणतात. सामरिकतज्ञ विलियम एस. लिंड यांच्या पुस्तकातील व्याख्येनुसार मुलतः समाजातील तेढ, दरी आणि असंतोष निर्मितीला आणि त्याद्वारे केल्या गेलेल्या राष्ट्र व समाज विघटनाला फोर्थ जररेशन वॉर फेअर म्हणतात. ह्यासाठी बाह्य शत्रुची गरज नसते. ही अंतर्गत कामगिरी असते. त्यामुळे शहरी नक्षलवाद मुक्त विचारांचे खुले अदानप्रदान उपयोगात आणल्या गेलेल्या व्यक्ती, संस्था किंवा संसाधनांना शहरी नक्षलवाद म्हणता येईल. शहीर तरूणांचा बुध्दीभ्रम करायचा त्यांना खोट्या सांस्कृतिक पाशामध्ये बांधून स्वप्न दाखवून भारत विरोधी भावना भडकावयाच्या हेच शहरी नक्षलवाद्यांचे ध्येय असते. नक्षलवादाचा विश्लेषक निवृत्त कॅप्टन स्मिता गायकवाड यांच्या मतानुसार शहरी नक्षलवाद हा - युध्दांचा वेगळाच प्रकार ज्याला फोर्थ जनरेशन युध्द म्हणावे लागेल. - जिथे शत्रु अदृश्य असेल आणि समाज मनावर परिणाम करून बुध्दीभेद करून समाजावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल अशा फोर्थ जनरेशन वॉर फेअर या नव्याने येऊ घातलेला धोका भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेला मोठे आव्हान आहे. यावर वेळीच लक्ष २ घालण्याची गरज आहे.

## 7. केंद्र, राज्य सरकार

नक्षलवाद संपविण्याकरीता केंद्र आणि राज्य सरकारने सुरक्षेच्या आवरणात विकास हे सुत्र निश्चित केले. मुळात हा प्रश्न न राज्यांचा की केंद्राचा यावरून देशात आजही मतभिन्नता आहे. काही च राज्ये यात यशस्वी झाली परंतु काहींना यश मिळाले नाही. नक्षल्यांशी लढणाऱ्या राज्यांना आर्थिक व सुरक्षा विषयक रसद पुरवण्याची जबाबदारी केंद्राची आहे. केंद्राने ही जबाबदारी पार पाडतांना कधीच बर धोरण सातत्य ठेवले नाही. नक्षलग्रस्त भागात सुरक्षा यंत्रणेचे जाळे वा सुदृढ करण्यासाठी केंद्राने राज्यांना निधी देण्याचे धोरण स्विकारले.

नवीन वाहने, शस्त्रे, पोलीस ठाणे, सुरक्षतळाच्या इमारती यासाठी हा निधी दिला जातो. आधी केंद्र ८०% निधी द्यायचे तर राज्यांना २०% निधी खर्च करावा लागायचा. अलीकडच्या सरकारने हे सुत्र ६०-४० केले. यात स्वतःचा वाटा देण्यात केंद्र नेहमीच अपयशी ठरले त्यामुळे आजही दोन दशकानंतर सुरक्षा दले व पोलीस जवान टिनाच्या शेड मध्ये राहतात. दुरसंचार यंत्रणा कार्यान्वित नाही असे सर्व प्रश्न सोडविण्याची जबाबदारी राज्य व केंद्राची आहे. परंतु समन्वयाच्या अभावी ते प्रश्न सुटत नाही अशा प्रतिकुल परिस्थितीत राहणाऱ्या जवानांकडून मनोधैर्याची अपेक्षा करणे चुकीचे आहे. थोडक्यात केंद्र-राज्य दोघांचा समन्वय महत्वाचा आहे.

## 8. सशस्त्र क्रांती

लोकशाही देशात सशस्त्र क्रांतीला थारा नाही. नक्षलवाद्यांना निशस्त्र करणे गरजेचे आहे. मात्र नक्षलवादी व सरकारच्या संघर्षात आदिवासी भरडले जाण्याचा धोका आहे. त्यावर उपाय म्हणजे नक्षलवाद्यांपासून आदिवासींना अलग करणे, आदिवासींचे राजकीय नेतृत्व यात मोठी भूमिका बजावू शकते. आंतरराष्ट्रीय राजकारणातल्या घटना क्वचितच योगायोगाने घडतात. बहुतांश घटनांचा मागे सुनियोजित प्लॅन व विचार असतो. भारतीय उपखंडात नक्षलवादी संघटनांनी पुकारलेल्या गनिमी काव्याला युध्दाला धार येणे हे सुध्दा आंतरराष्ट्रीय घटनाक्रमचा एक भागच आहे. खनिज संपत्तीने समृध्द ओरीसा, छत्तीसगड व झारखंड इत्यादी राज्यांनी आपली खनिज संपत्ती तशीच निर्यात न करता आपल्या प्रांतातच औद्योगिकीकरण करण्याचे ठरविले आहे. कच्च्या खनिजाच्या निर्यातील विरोध आहे. ७ फेब्रुवारी २०१९ रोजी सुरक्षा दलांनी छत्तीसगडमधील बिजापूरच्या भारामगर भागात दहा माओवाद्यांना ठार केले. ११ नोव्हेंबर २०१८ रोजी सुकामा जिल्ह्यात नऊ माओवादी ठार झालेत. नक्षलवाद्यांच्या रणनितीला उत्तर द्यायचे असेल तर तिथे कार्यरत असणाऱ्या सशस्त्र दलांनी आपली वागणुक कायद्याच्या चौकटीत ठेवुन सुड म्हणून आसपासच्या आदिवासींवर अत्याचार करता कामा नये हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा टेहाळणी, गुप्त बातम्या व जंगलात कारवाई करण्यासाठी देशाकडे असणाऱ्या आधुनिक सामुग्रीचा उपयोग केला जाईल. रात्रीच्या वेळीही वापरता येवू शकणारी शस्त्र प्रणाली इथे वापरण्याची गरज आहे. नक्षलवाद्यांची समस्या ही केवळ लष्करी समस्या नव्हे तर प्रशासनातील आर्थिक, सामाजिक, मनोवैज्ञानिक व राजकीय असे अनेक पैलू आहेत. परंतु हे सर्व उपाय करण्याआधी हिंसाचारवर अंकुश ठेवणे गरजेचे आहे. आज नक्षलवाद्यांच्या विरूध्द बल प्रयोग करण्याच्या विरोधात उतरलेले लोक हे विसरतात की काश्मिर, नागा, मिझो बंडाळ्या काबूत येण्यासाठी मोठ्या प्रमाणावर बलप्रयोगच केला गेला. सर्वसामान्य जनतेला नक्षलवाद म्हणजे काय हेच अद्याप माहित नाही परंतु एल्गार परिषद आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ठार मारण्याची कटाची बातमी आल्याने सामान्य नागरिकांना नक्षलवाद हे जाणून घेण्याची उत्सुकता निर्माण झाली आहे. गडचिरोली न जिल्ह्यात तब्बल ६६ नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले. देशातील सर्वात मोठी कार्यवाही सुध्या गडचिरोली जिल्ह्यात झाली.

जगातील दहशतवादी संघटनांच्या हालचालीवर लक्ष ठेवते. त्यांच्या म्हणण्यानुसार २०१६ मध्ये माओ दहशतवाद्यांचा जगात चौथा क्रमांक आहे. त्या अगोदर तालिबान, इसिस, बोको हराम यांचे क्रमांक आहेत. सन २०१६ मध्ये माओ दहशतवाद्यांनी भारतात ९२९ हल्ले केलेत. ज्यामध्ये ३४० निष्पापाचे बळी गेलेत. देशातील एकूण दहशतवादी घटनांपैकी माओ दहशतवाद्यांनी ४३% घटना घडविल्या. गोंदिया व गडचिरोली जिल्ह्यात आजपर्यंत ५२३ पोलीस ठार मारले. ७०० पेक्षा जास्त - निष्पाप आदिवासींचे खून केलेत. सर्व सामान्यांना नक्षलवाद म्हणजे - आदिवासी लोकांसाठी काम करणारी सामाजिक संघटना जी बंदूक - हाती घेते असा समज आहे. छत्तीसगढमध्ये सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये जोरदार चकमक झाल्याचं वृत्त आहे. ९ फेब्रुवारी, २०२४ रविवारी ही चकमक झाली. सुरक्षा दलांना नक्षलवाद्यांच्या उपस्थितीची, घुसखोरीची माहिती मिळाली होती. त्यानंतर सुरक्षा दलांनी जंगलात शोधमोहीम सुरू केली होती. याचदरम्यान नक्षलवाद्यांनी सुरक्षादलावर हल्ला केला. नक्षलवाद्यांच्या हल्ल्यानंतर जवानांनीही हल्ल्याला प्रत्युत्तर दिलं. या चकमकीत जवळपास १० ते १२ नक्षलवादी मारले गेल्याची माहिती आहे. तर दोन जवान शहीद झाले.

## 9. माओ तत्वज्ञान ते नक्षलवाद

भारतामध्ये पूर्वी काही राज्यांमध्ये जमीनदारी पध्दत मोठ्या प्रमाणावर होती. या जमीनीवर काम करणारे भुमिहीन लोकांनी जमिनीचे वाटप व्हावे म्हणुन जमिनदारांविरूध्द सशस्त्र लढा प्रथम पश्चिम बंगालमधील नक्षलबारी या गावी चारू मुजुमदार व कानु सन्याल यांच्या नेतृत्वाखाली लढला गेला. हे दोनही चीनचे माओ यांच्या तत्त्वज्ञानापासून प्रेरणा घेवून जमीनदार वर्ग व राजकीय प्रशासन यांना उलथवून टाकण्यासाठी सशस्त्र लढा दिला. हा लढा वेगाने इतरत्र पसरला आणि ज्या कोणी या लढ्यास विरोध करतील त्यांना नष्ट केले गेले. आज हे काम भारतीय कम्युनिष्ट पार्टी ऑफ इंडिया (माओवादी) करत आहे. यातुनच माओवाद किंवा चळवळ नक्षलबारीतून सुरू झाल्याने नक्षलवाद असे म्हणतात. माओचे असे म्हणणे होते की राजकीय सत्ता ही

बंदूकीच्यानळीमधून वाहते. माओच्या तत्वज्ञानानुसार कोणताही ज्वलंत प्रश्न माओवादी घोषणामध्ये परवर्तीत करणे व नंतर ती कृती घोषणामध्ये परीवर्तीत करणे या तत्वज्ञानाप्रमाणे आज माओवादी शेतकज्यांचा प्रश्न असो, महिलांचा प्रश्न असो, खैरलांजी, भिमाकोरगावची घटना असो या माध्यमातुन अशा प्रकारच्या प्रचारतंत्राचा वापर करतात. माओच्या तत्वज्ञानानुसार सशस्त्र लढा देवून प्रथम खेडे विभाग ताब्यात घेणे अशारितीने शहराभेवतालची खेडे विभाग ताब्यात घेवून शहरास घेरणे व शहरे ही सरकारची बालेकिल्ले असल्याने ती ताब्यात घेणे व अशा रितीने देश ताब्यात घेणे हा त्यांचा अंतिम उद्देश आहे. हे भारतीय सर्वसामान्यांना कधी कळलेच नाही.

## 10. उपाय

नक्षललग्रस्त भागात विकासाची प्रक्रिया बहुआयामी असावी लागते. आरोग्य, शिक्षण, रस्ते, पिण्याचे पाणी व सरकारी योजनांना गावात पोहचवून मुलभूत कामे हाती घ्यावी लागतील, यातूनच स्थानिकांशी संवाद सुरू होतो. या कामांना नक्षलाचा विशेष विरोध नाही. मात्र प्रशासन नक्षलवादाचा बागुलबुवा उभ करून या मुलभूत सोयी सुध्दा पुरवीत नाही. पोलीस व सुरक्षा दलांनी संयुक्तपणे गावभेटीचा कार्यक्रम राबविला तर त्यातुन अनेक लहानमोठ्या समस्या समोर चेतात. त्या तातडीने सोडविता येणे शक्य आहे. या भागात विकासाची कामे करतांना निर्धारीत वेळेतच पूर्ण व्हायला हवी. याकडे कटाक्षाने बघणे आवश्यक ठरते. या भागात होणाज्या प्रत्येक कामाचे सामाजिक अंकेक्षण होणे गरजेचे आहे.

नक्षलवादी किंवा माओवादी यांचा खरा चेहरा समजावून घ्या कारण लोकशाही आणि संविधान नाकारणारी ही विध्वंसक शक्ती देशासाठी घातक आहे.

आपले शहर नक्षलवादाचे ध्येय साध्य करण्यासाठी नक्षली संघटना चीन, म्यानमार, बांगलादेश, कश्मीरी जिहादी, बाह्यदेशातून आर्थिक मदत मिळवत असलेले ख्रिश्चन मिशनरीज आणि पाकिस्तानी आय.एस.आय. चे सहाय्य घेण्यास मागेपुढे पाहत नाही. लाल बटव्याखाली लढणा-या फुटीरवाद्यांना निष्पाप शहर नक्षलवाद अंत झाल्याशिवाय होणे अशक्य आहे.

शिक्षण, आरोग्य, विज, रस्ते या सारख्या मुलभूत सुविधा देणे गरजेचे आहे. प्रशासन व राजकीय नेत्यांनी जबाबदारीने काम करणे. केंद्र राज्य यांच्यात समन्वय कार्यप्रणाली वेग असायला पाहीजे. आदिवासी भागात उद्दोगधंदे, रोजगार निर्माण करावा, नक्षल्यांविरूध्द सामना करतांना प्रशिक्षण, उत्तम शस्त्रास्त्रे सरकारने पुरविली पाहीजे. विचार क्रांती विचारधारेने संपविता आली पाहीजे. देशद्रोह, फुटीरवाद याकरीता कठोर कायदे कार्यान्वित करावीत.

## 11. परिणाम

1) नक्षलवादी चळवळीला लोकशाही शासन व्यवस्था मान्य नाही. त्यामुळे भारताच्या सुरक्षा मुल्यांवर आघात करणारी आहे.
2) नक्षलवादी चळवळ लोकशाही व संविधान यांच्या विरूध्द म्हणजे साम्यवाद विचारधारेवर आधारित आहे.
3) नक्षलवाद्यांच्या साह्याने शेजारील चीन, बांगलादेश, म्यानमार, पाकिस्तान सारख्या राष्ट्रांना भारतीय सुरक्षा व्यवस्थेत हस्तक्षेप करण्याची संधी मिळते.
4) नक्षल चळवळीने गेल्या पन्नास वर्षात भारतात हिंसक कार्यवाहीत आर्थिक नुकसान झाले आहे. त्याचा परिणाम सरळ सुरक्षेवर होतो.
5) नक्षलवाद्यांच्या विस्तार लालपट्टा ते फोर्थ जनरेशन वॉर फेअर पर्यंत मजल मारली आहे. त्याचा परिणाम केवळ आकारमानावर नाही तर विचारधारेवर होत आहे. आणि विचारधारा राष्ट्र सुरक्षेचा मोठा आधार मानला जातो यावर आघात होत आहे.
6) नक्षलग्रस्त भागात सर्वसामान्य नागरीकांना भीती निर्माण झाली आहे. भयमुक्त वातावरण म्हणजे सुरक्षा या धोरणावर परिणाम होत आहे.

## 12. निष्कर्ष

गेल्या पन्नास वर्षापासून भारतात प्रस्थपितांच्या विरूध्द असणारा ला लढा नक्षलवाद ते फोर्थ जनरेशन वॉर फेअर पर्यंत येवून पोहचलेला आहे. नक्षलवादाची व्याप्ती केवळ जमीनीवरच नाही तर मनामनावर आधीराज्य गाजवित आहे. नक्षलवादाविरूध्द सरकारला सपशेल अपयश मिळाले आहे. नक्षलवाद हा दहशतवादच आहे हे जो पर्यंत देशात मान्य केले जात नाही तो पर्यत नक्षल व सरकार संघर्षात आदिवासी निष्पाप तरूण व देशातील पोलीस जवान यांना बलिदान द्यावे लागत आहे. नक्षललांच्या मुळ कारणाचा - शोध घ्यावा कारण नक्षलवादी हे आपल्याच समाजव्यवस्थेचा घटक आहे हे न विसरता सकारात्मक प्रयत्नाची गरज आहे.

## सन्दर्भ

डॉ.व्ही.वाय. जाधव 'भारताची अंतर्गत सुरक्षा' अथर्व पब्लिकेशन जळगांव, जुलै २०१४

अघोर अश्विन 'भारतातून नक्षलवादइ न संपण्यामागच कारण एक व्यापक कारस्थान' गव्र्हमेंट नक्षालिस्ट ऑनलाईन ब्लॉग, २७ ऑगस्ट २०१७

गतपते सौरभ नक्षलवाद हा दहशतवाद आहे' ऑनलाईन ब्लॉग, २५ एप्रिल २०१७

कर्नल अभय पटवर्धन 'काय आहे शहरी नक्षलवाद' - म.टा. ऑनलाईन, ११ नोव्हेंबर २०१८

कॅप्टन स्मिता गायकवाड 'माओवाद्यांना वेळीच ओळखा'म.टा. ऑनलाईन, १३डिसेंबर २०१८

देवेंद्र गावंडे 'नक्षलवाद केंद्र राज्य सरकार चिकित्सा' लोकसत्ता, ४ मे २०१७

कर्नल डॉ. अनिल आठवल्ये 'नक्षलवादविरूध्द उपाय काय?" ऑनलाईन लोकसत्ता

डॉ. गोविंद गारे 'नक्षलवादी आणि आदिवासी' सुगावा प्रकाशन पुणे, २००३

वृत्तसंस्था 'छत्तीसगड मध्ये सुरक्षा दलाच्या कार्यवाहीत क १० माओवादी ठार' प्रत्येक्ष दैनिक पेपर, मुंबई ८ फेब्रुवारी २०१९

https://unacademy.com/content/bank-exam/study-material/general-awareness/a-brief-overview-of-naxalism-and-its-causes/

https://forumias.com/blog/answeredwhat-is-naxalism-discuss-various-reasons-of-naxalism-and-government-efforts-to-root-out-naxalism-from-the-country/